RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष ११, अंक ३५] बुधवार, सप्टेंबर २४, २०२५/आश्विन २, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ६६

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २४ सप्टेंबर २०२५.

अधिसूचना

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३.

क्रमांक मकाक-११२५/प्र.क्र. १८०/काम-१०.—ज्याअर्थी, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम (१९५३ चा ४०) (यात यापुढे, ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) यासह महाराष्ट्र कामगार कल्याण निधी नियम, १९५३ याच्या नियम १० द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, निर्गमित केलेली शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. एमएसए-०३/२०१३/प्र.क्र. ७८/कामगार-१०, दिनांक २५ फेब्रुवारी २०१४ (यात यापुढे, जिचा निर्देश, "उक्त अधिसूचना" असा केला आहे) याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ (यात यापुढे, ज्याचा निर्देश, "उक्त मंडळ" असा केला आहे) पुनर्घटित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, दिनांक ३१ मे २०१६ च्या शासकीय आदेशाद्वारे, उक्त मंडळ अधिक्रमित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, मंडळ पुनर्घटित करीपर्यंत, कामगार कल्याण निधीचे प्रशासन करणे व उक्त मंडळाची कार्ये पार पाडणे या प्रयोजनार्थ, अधिकारी नियुक्त करणे आवश्यक असल्याने, राज्य शासनास, उक्त मंडळाचे अधिकार वापरण्यासाठी व कार्ये पार पाडण्यासाठी अधिकारी नियुक्त करणे इष्ट आहे, असे वाटते.

आता, म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १८, च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, राज्य शासन, उक्त मंडळाची पुनर्रचना होईपर्यंत, उप सचिव (कामगार-१०) यांची उक्त मंडळाचे अधिकार आणि कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्ती करत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आय. ए. कुंदन,
शासनाच्या प्रधान सचिव.

INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated 24th September 2025.

NOTIFICATION

MAHARASHTRA LABOUR WELFARE FUND ACT, 1953.

No. MKK-1125/C. R. 180/Labour-10.— Whereas, the Government of Maharashtra has *vide* the Government Notification, Industries, Energy and Labour Department No. MKK-03/2013/C.R. 78/ Labour-10, dated the 25th February 2014 (hereinafter referred to as "the said notification") issued in exercise of powers conferred by sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Labour Welfare Fund Act (XL of 1953) (hereinafter referred to as "the said Act") read with rule 10 of the Maharashtra Labour Welfare Fund Rules, 1953, reconstituted the Maharashtra Labour Welfare Board (hereinafter referred to as "the said Board") for the whole of the State of Maharashtra ;

And whereas, the said Board is superseded by the Government Order dated 31st May 2016 ;

And whereas, until the Board is re-constituted, it is necessary to appoint an Officer for the purposes of administering the labour welfare fund and to carry on the functioning of the said Board, the State Government considers it expedient to appoint an Officer to exercise the powers and perform the functions of the said Board.

Now, therefore, in exercise of powers conferred by sub-section (*2*) of section 18 of the said Act, the State Government hereby appoints the Deputy Secretary (Labour-10) to exercise the powers and perform the functions of the said Board until the said Board is re-constituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

I. A. KUNDAN,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.